**माझी वसुंधरा अभियान-५.० राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राबविण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग**
**शासन निर्णय, क्रमांक मावअ २०२४/ प्र.क्र. २४/ तां.क.१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई ४०००३२
दिनांक : ६ सप्टेंबर, २०२४

**वाचा** : (१) शासन निर्णय, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग क्रमांक अभियान-२०२०/ प्र. क्र.१३४/ तां.क.१, दिनांक १४ ऑक्टोबर, २०२०
(२) शासन निर्णय, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग क्रमांक अभियान-२०२१/ प्र. क्र.१६/ तां.क.१, दिनांक २१ जानेवारी, २०२१
(३) शासन निर्णय, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग क्रमांक मावआ-२०२१/ प्र. क्र.७५/ तां.क.१, दिनांक २२ डिसेंबर, २०२१
(४) शासन निर्णय, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग क्रमांक मावआ-२०२२/ प्र. क्र.१०८/ तां.क.१, दिनांक ०७ नोव्हेंबर, २०२२
(५) शासन निर्णय, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग क्रमांक मावआ-२०२३/ प्र. क्र.८३/ तां.क.१, दिनांक २७ सप्टेंबर, २०२३

**प्रस्तावना:**

पर्यावरणातील वातावरणीय बदलाचे महत्व लक्षात घेता, पर्यावरण विभागाचा **"पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग"** असा नामबदल करण्यात आला आहे. निसर्गाशी असलेली कटिबद्धता निश्चित करण्यासाठी पृथ्वी, वायू, जल, अग्नी, आणि आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्वावर पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग कार्य करीत आहे.

२. पर्यावरणाचे जतन, संवर्धन व संरक्षण करण्यासाठी **"माझी वसुंधरा (माय अर्थ)"** हा अभिनव उपक्रम विभागाने हाती घेतला आहे. जो निसर्गाच्या **"पंचमहाभूते"** नावाच्या पाचही घटकांवर लक्ष केंद्रित करतो. त्यात भूमी (जमीन), जल (पाणी), वायू (हवा), अग्नी (ऊर्जा), आकाश (संवर्धन) यांचा समावेश आहे. या उपक्रमातून वातावरणीय बदल आणि पर्यावरणाच्या समस्यांबद्दल नागरिकांना जागरूक करून पर्यावरणाच्या सुधारणेप्रती प्रयत्न करण्यात येतात.

३. **माझी वसुंधरा अभियान:**

३.१ पृथ्वी, वायू, जल, अग्नी, आणि आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर आधारित **"माझी वसुंधरा अभियान"** राज्यामध्ये दिनांक २ ऑक्टोबर, २०२० पासून राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्था व ग्राम पंचायती या स्थानिक स्वराज्य संस्थांची पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करणाऱ्या योजना प्रभावीपणे व मिशन मोड पध्दतीने राबविण्यासाठी स्पर्धा घेण्यात येते.

३.२ निसर्गाच्या पंचतत्वावर आधारित पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करणाऱ्या विविध शासकीय योजना / कार्यक्रम / उपाय योजना एकत्रित करून त्या प्रभावीपणे व मिशन मोड पध्दतीने राबविण्यासाठी इंडिकेटर स्वरूपात असलेली टुलकिट तयार करून स्थानिक स्वराज्य

संस्थांना दिली जाते. ज्यामध्ये त्यांनी केलेल्या कामाचे मुल्यमापन करण्यासाठी गुण ठेवण्यात येतात. या टूलकिटनुसार विविध उपाययोजना स्थानिक संस्थांमध्ये एप्रिल ते मार्च या एक वर्षाच्या कालावधीत राबवावयाच्या आहेत.

३.३ माझी वसुंधरा अभियानात सहभागी सर्व स्थानिक संस्थांनी एप्रिल ते मार्च या कालावधीत माझी वसुंधरा अभियानांतर्गत केलेल्या कामाची माहिती एम.आय.एस. स्वरूपात माझी वसुंधरा अभियानाच्या वेब पोर्टलवर भरावयाची आहे. त्यानंतर, स्थानिक संस्थांनी भरलेल्या एम.आय.एस. चे डेस्कटॉप मुल्यमापन त्रयस्त यंत्रणेमार्फत करण्यात येते.

३.४ डेस्कटॉप मुल्यमापनात गुणानुक्रमे उच्चत्तम कामगिरी करणाऱ्या स्थानिक संस्थांचे क्षेत्रीय मुल्यमापन त्रयस्त यंत्रणे मार्फत संबंधित स्थानिक संस्थेमध्ये प्रत्यक्ष भेट देवून करण्यात येते.

३.५ डेस्कटॉप मुल्यमापन व क्षेत्रीय मुल्यमापन यामध्ये प्राप्त होणाऱ्या एकूण गुणांच्या आधारे उच्चत्तम कामगिरी करणाऱ्या स्थानिक संस्थांची विजेते म्हणून निवड करून या स्थानिक संस्थांचा सन्मान जागतीक पर्यावरण दिनी म्हणजे दिनांक ५ जून रोजी करण्यात येतो.

**४. माझी वसुंधरा अभियान १.०, २.०, ३.० व ४.० ची अंमलबजावणी:**

**४.१ माझी वसुंधरा अभियान १.०** या अभियानाच्या पहिल्या वर्षात (२०२०-२१) राज्यामधील ६८६ स्थानिक स्वराज्य संस्थांनी (अमृत शहरे ४३ , नगरपरिषदा २२२, नगरपंचायती १३० व ग्रामपंचायती २९१) सहभाग घेतला होता. माझी वसुंधरा अभियान १.० मध्ये (१) अमृत, (२) नगर परिषद, (३) नगर पंचायत, (४) ग्राम पंचायत असे ०४ गट ठेवण्यात आले होते. या अभियानात निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर स्थानिक स्वराज्य संस्थांनी केलेल्या कामांचे मुल्यमापन करण्यासाठी १,५०० गुण ठेवण्यात आले होते. या अभियानाचा कालावधी २ ऑक्टोबर, २०२० ते दिनांक ३१ मार्च २०२१ असा होता. या अभियानात सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या विजेत्यांचा सन्मान दिनांक ५ जून, २०२१ रोजी माझी वसुंधरा अभियान ऑनलाईन सन्मान सोहळयात करण्यात आला.

**४.२ माझी वसुंधरा अभियान २.०** मध्ये माझी वसुंधरा १.० पेक्षा ५ पट जास्त म्हणजेच एकूण ११,९६८ (४०६ नागरी, ११,५६२ ग्राम पंचायती) एवढ्या स्थानिक स्वराज्य संस्थांनी नोंदणी करून सहभाग घेतला होता. माझी वसुंधरा अभियान २.० मध्ये (१) अमृत, (२) नगर परिषद, (३) नगर पंचायत, (४) ग्राम पंचायत ०१ व (५) ग्राम पंचायत ०२ असे ०५ गट ठेवण्यात आले होते. या अभियानात निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर स्थानिक स्वराज्य संस्थांनी केलेल्या कामांचे मुल्यमापन करण्यासाठी अमृत गटासाठी ६,००० तर अमृत गट वगळून इतर गटासाठी ५,५०० गुण ठेवण्यात आले होते. हे अभियान दिनांक १६ एप्रिल २०२१ पासून ३१ मार्च २०२२ या कालावधी मध्ये राबविण्यात आले होते. या अभियानात विजेत्यांचा सन्मान दिनांक ५ जून, २०२२ रोजी आयोजित माझी वसुंधरा अभियान सन्मान सोहळयात करण्यात आला.

**४.३ माझी वसुंधरा अभियान ३.०** मध्ये एकूण १६,८२४ (माझी वसुंधरा २.० पेक्षा ४,८५६ ने अधिक) (४११ नागरी, १६,४१३ ग्राम पंचायती) स्थानिक स्वराज्य संस्थांनी सहभाग घेतला होता. माझी वसुंधरा अभियान ३.० मध्ये मोठया प्रमाणात स्थानिक संस्थांनी सहभाग घेतल्याने लोकसंखेच्या प्रमाणात एकूण ११ गट करण्यात आले होते. या अभियानात निसर्गाशी

संबंधित पंचतत्वांवर स्थानिक स्वराज्य संस्थांनी केलेल्या कामांचे मुल्यमापन करण्यासाठी अमृत गटासाठी ७,६०० तर, अमृत गट वगळून इतर गटासाठी ७,५०० गुण ठेवण्यात आले होते. माझी वसुंधरा अभियान ३.० चा कालावधी १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३ पर्यंत होता. या अभियानात विजेत्यांचा सन्मान दिनांक ५ जून, २०२३ रोजी आयोजित माझी वसुंधरा अभियान सन्मान सोहळ्यात करण्यात आला.

४.४ **माझी वसुंधरा अभियान ४.०** मध्ये एकूण २२,६३२ (माझी वसुंधरा ३.० पेक्षा ५८०८ ने अधिक) (४१४ नागरी, २२,२१८ ग्राम पंचायती) स्थानिक स्वराज्य संस्थांनी सहभाग घेतला होता. माझी वसुंधरा अभियान ४.० मध्ये मोठया प्रमाणात स्थानिक संस्थांनी सहभाग घेतल्याने लोकसंखेच्या प्रमाणात एकूण १२ गट करण्यात आले होते. या अभियानात निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर स्थानिक स्वराज्य संस्थांनी केलेल्या कामांचे मुल्यमापन करण्यासाठी अमृत गटासाठी ८,३०० , अमृत गट वगळून इतर नागरी संस्थांसाठी ८,१०० तर, ग्राम पंचायतींसाठी ८,२०० गुण ठेवण्यात आले होते. माझी वसुंधरा अभियान ४.० चा कालावधी १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ असा होता. परंतु, लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीमुळे हा कालावधी दिनांक ३१ मे, २०२४ पर्यंत वाढविण्यात आला होता.

५. माझी वसुंधरा अभियानांतर्गत स्थानिक संस्थांनी पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करणाऱ्या विविध योजनांची मागील वर्षामधील प्रभावीपणे अंमलबजावणी केल्यामुळे झालेली फलनिष्पती विचारात घेवून **“माझी वसुंधरा अभियान ५.०” ची** प्रारूप टूलकिट तयार करून ती सर्वसंबंधितांना पाठवून अभिप्राय मागविण्यात आले होते. यासंदर्भात प्राप्त झालेले अभिप्राय विचारात घेवून **“माझी वसुंधरा अभियान ५.०” ची** टूलकीट अंत्तीम करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करून, पृथ्वी, वायू, जल, अग्नी, आणि आकाश या सर्वांशी संबंधित पंचतत्वांवर आधारित “**माझी वसुंधरा अभियान ५.०**” हे राज्यातील माझी वसुंधरा अभियानांतर्गत नोंदणी केलेल्या सर्व म्हणजे २८,३१७ स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये (नागरी स्थानिक स्वराज्य संस्था ४१८ व ग्राम पंचायती- २७,८९९) राबविण्यास शासन मान्यता देत आहे.

२. तसेच, “**माझी वसुंधरा अभियान ५.०**” करिता स्थानिक स्वराज्य संस्थांचे लोकसंख्या निहाय खालील प्रमाणे गट करून त्यानुसार स्पर्धेची अंमलबजावणी करण्यासही शासन मान्यता देत आहे.

| अ.क्र. | | लोकसंख्या निहाय गट | समाविष्ट स्थानिक संस्थांची संख्या |
|---|---|---|---|
| (अ) | नागरी स्थानिक स्वराज्य संस्था : ४१८ | | |
| (०१) | अमृत शहरे (४३) | १० लक्ष पेक्षा अधिक लोकसंख्या | १० |
| (०२) | | ३ लक्ष पेक्षा अधिक परंतु १० लक्ष पेक्षा कमी लोकसंख्या | १७ |
| (०३) | | १ लक्ष पेक्षा अधिक परंतु ३ लक्ष पेक्षा कमी लोकसंख्या | १६ |
| (०४) | नगरपरिषद व नगर पंचायत (३७५) | ४० हजार पेक्षा अधिक परंतु १ लक्ष पेक्षा कमी लोकसंख्या | ७६ |
| (०५) | | २५ हजार पेक्षा अधिक परंतु ४० हजार पेक्षा कमी लोकसंख्या | ८७ |
| (०६) | | १५ हजार पेक्षा अधिक परंतु २५ हजार पेक्षा कमी लोकसंख्या | १०० |
| (०७) | | १५ हजार पेक्षा कमी लोकसंख्या | ११२ |

| (ब) | **ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था : २७,८९९** | | |
|---|---|---|---|
| (०८) | **ग्राम पंचायती** | **१० हजार पेक्षा अधिक लोकसंख्या** | **३४६** |
| (०९) | | **५ हजार पेक्षा अधिक व १० हजार पेक्षा कमी लोकसंख्या** | **१,४००** |
| (१०) | | **३ हजार पेक्षा अधिक व ५ हजार पेक्षा कमी लोकसंख्या** | **३,२६१** |
| (११) | | **२ हजार पेक्षा अधिक व ३ हजार पेक्षा कमी लोकसंख्या** | **५,३३५** |
| (१२) | | **१.५ हजार पेक्षा जास्त व २ हजार पेक्षा कमी लोकसंख्या** | **४,९४३** |
| (१३) | | **१ हजार पेक्षा जास्त व १.५ हजार पेक्षा कमी लोकसंख्या** | **६,७८३** |
| (१४) | | **१ हजार पेक्षा कमी लोकसंख्या** | **५,८३१** |

३. माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांनी पृथ्वी, वायू, जल, अग्नी, आणि आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर केलेल्या कामांचे मुल्यमापन करण्यासाठी विविध इंडिकेटर असलेली प्रारूप टूलकिट (नागरी व ग्रामीण साठी स्वतंत्र) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या काही प्रतिनिधीशी व या क्षेत्रात काम करणाऱ्या काही स्वयंसेवी संस्थांशी चर्चा करून तयार करण्यात आली आहे. त्यानंतर सदर प्रारूप टूलकिट सर्व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना व इतरांना पाठवून त्यांच्याकडून अभिप्राय / हरकती / सूचना मागविण्यात आल्या होत्या. प्राप्त झालेले अभिप्राय / हरकती / सूचना विचारात घेवून तयार करण्यात आलेल्या **माझी वसुंधरा अभियान ५.० ची टूलकिट अंतिम करण्यास शासन मान्यता देत आहे.** माझी वसुंधरा अभियान ५.० च्या अंतिम टूलकिट नुसार गुणांचे सविस्तर वितरण व मुल्यांकन या बाबतची कार्यपध्दती दर्शविणारी **नागरी व ग्रामीण** स्थानिक स्वराज्य संस्थांसाठीची अंतीम टुलकिट अनुक्रमे ***परिशिष्ट-१ व परिशिष्ट-२* म्हणून *(*इंग्रजी व मराठी *)*** या शासन निर्णया सोबत **जोडली आहे.**

४. माझी वसुंधरा अभियान ५.० च्या अंतिम टूलकिट नुसार, स्थानिक स्वराज्य संस्थांनी पृथ्वी, वायू, जल, अग्नी, आणि आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर केलेल्या कामांचे मुल्यमापन करण्यासाठी खाली दिलेल्या विगतवारीनुसार **अमृत गटासाठी १५,४०० व अमृत गट वगळून इतर नागरी संस्थांच्या गटांसाठी १४,९०० तर ग्राम पंचायतींसाठी १४,०००** गुण ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे:-

| **विषय / गुण** | **भूमी / Earth** | **वायू / Air** | **जल / water** | **अग्नी / Energy** | **आकाश / Enhancement** | **माझी वसुंधरा ५.० चा एमआयएस दिनांक १ ते ५ एप्रिल मध्ये दाखल करण्यासाठी (Early Bird)** |
|---|---|---|---|---|---|---|
| नागरी स्थानिक संस्था (अमृत) (१५,४००) | ४,९०० | ३,६०० | १,८०० | १,६०० | ३,३०० | २०० |
| नागरी स्थानिक संस्था (अमृत वगळून) (१४,९००) | ४,९०० | ३,१०० | १,८०० | १,६०० | ३,३०० | २०० |
| ग्राम पंचायती (१४,०००) | ४,६२५ | २,२७५ | १,९०० | १,७०० | ३,३०० | २०० |

५. माझी वसुंधरा अभियानांतर्गत नागरी व ग्रामीण स्थानिक संस्थांमध्ये राबवावयाच्या पंचतत्वांमधील उपरोक्त विविध इंडिकेटर अंतर्गत उपक्रमांचा विस्तृत तपशील व त्यासाठीच्या गुणांचे सविस्तर वितरण खालील तक्त्यात नमूद केले आहे. तर, मुल्यांकना बाबतची सविस्तर कार्यपध्दती टूलकिट मध्ये देण्यात आली आहे.

| अ.क्र. | निर्देशक<br>(अभियान काळातील कार्यवाहीसाठीच्या बाबी) | गुण | |
|---|---|---|---|
| | | नागरी | ग्रामीण |
| **१** | **भूमी** | | |
| | **हरित आच्छादन आणि जैवाविविधता** | | |
| (१) | माझी वसुंधरा अभियानादरम्यान लावलेली आणि जगलेली एकूण झाडे | ६०० | ६०० |
| (२) | जिओ-टॅगिंगसह वृक्षगणना - तयारी आणि प्रकाशन | १२५ | १२५ |
| (३) | महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ ची अंमलबजावणी | १५० | -- |
| (४) | रोपवाटिकांची निर्मिती | १०० | १०० |
| (५) | नवीन हरित क्षेत्रांचा विकास व देखभाल | ३०० | ३०० |
| (६) | वृक्ष योजना : किमान ३३% हरित आच्छादन प्राप्त करण्यासाठीची योजना | २२५ | -- |
| (७) | लोकजैवविविधता नोंदवही (PBR): तयारी आणि दस्तावैजीकरण तयार करणे. | १५० | १५० |
| (८) | मातीच्या माध्यमातून कार्बन सिंक करणे. | १५० | १५० |
| (९) | बांबू / खस / शेवगा लागवड | १५०० | १५०० |
| (१०) | बीज संकलन केंद्र | १५० | १५० |
| (११) | शाश्वत शेती | -- | २०० |
| | **हरित आच्छादन आणि जैवाविविधता-एकूण** | **३,४५०** | **३,२७५** |
| | **घनकचरा व्यवस्थापन** | | |
| (१) | घनकचरा व्यवस्थापन: निर्मितीच्या ठिकाणी विलगीकरण आणि संकलन | ३०० | २०० |
| (२) | ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया | २०० | २०० |
| (३) | सुक्या कचऱ्यावर प्रक्रिया/विल्हेवाट | २५० | २०० |
| (४) | जुन्या साठलेल्या कचऱ्यावर (Legacy Waste) शास्त्रोक्त प्रक्रिया | १०० | १०० |
| (५) | प्लास्टिक कचरा व्यवस्थापन (सिंगल यूज प्लास्टिकवर (SUP) बंदी) | ३०० | ३०० |

| अ.क्र. | निर्देशक<br>(अभियान काळातील कार्यवाहीसाठीच्या बाबी) | गुण | |
|---|---|---|---|
| | | नागरी | ग्रामीण |
| (६) | जैव-वैद्यकीय (बायो-मेडिकल) कचरा व्यवस्थापन | १०० | १०० |
| (७) | ई-कचरा व्यवस्थापन | १०० | १५० |
| (८) | हागणदारीमुक्तीचा (ओडीएफ) दर्जा | १०० | १०० |
| | **घनकचरा व्यवस्थापन-एकूण** | **१४५०** | **१३५०** |
| | **भूमी-एकूण** | **४,९००** | **४,६२५** |
| **२.** | **वायू** | | |
| (१) | वायु गुणवत्ता परिक्षण - पर्यावरण, वने आणि वातावरणीय बदल मंत्रालय (MoEF&CC) किंवा NABL मान्यताप्राप्त प्रयोगशाळेद्वारे | ५०० | २०० |
| | **वायू प्रदूषण कमी करणे** | | |
| (२) | फटाक्यांवर बंदी घालण्याकरिता पुढाकार | १७५ | १७५ |
| (३) | नागरिकांमध्ये चांगल्या सवयींना प्रोत्साहन- सायकलिंग ट्रॅकची निर्मिती आणि पादचारी मार्ग / कृषी कचरा व्यवस्थापन | १२५ | ३०० |
| (४) | बांधकाम व पाडकाम कचऱ्याचे व्यवस्थापन / गॅस कनेक्शन | ३०० | २०० |
| | **इलेक्ट्रिक वाहन धोरणाची प्रभावी अंमलबजावणी** | | |
| (५) | इलेक्ट्रिक वाहन (EV) धोरण : इलेक्ट्रिक वाहनांची संख्या | ९०० | ५०० |
| (६) | इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग स्टेशनची संख्या | ५०० | ३०० |
| (७) | ध्वनी प्रदूषण कमी करणे | १५० | १५० |
| (८) | वातावरणीय बदल (Climate Change) - जनजागृती | २५० | २५० |
| (९) | आपत्ती व्यवस्थापनाची तयारी | २०० | २०० |
| (१०) | वातावरणीय कृती नियोजन (फक्त अमृत गटासाठी) | ५०० | -- |
| | **वायू-एकूण अमृत गटासाठी** | **३,६००** | |
| | **वायू-एकूण (अमृत गट वगळून इतर गटांसाठी)** | **३,१००** | **२,२७५** |
| **३.** | **जल** | | |
| (१) | जल संसाधन संवर्धन आणि पुनरुज्जीवन | ३०० | ४५० |
| | **जल संवर्धन** | | |

| अ.क्र. | निर्देशक (अभियान काळातील कार्यवाहीसाठीच्या बाबी) | गुण | |
|---|---|---|---|
| | | नागरी | ग्रामीण |
| (२) | सार्वजनिक इमारतींवर पावसाच्या पाण्याचे संधारण (रेन वॉटर हार्वेस्टिंग) | २५० | २०० |
| (३) | पावसाचे पाणी झिरपणारे पाझरखड्डे (रेन वॉटर परकोलेशन पिट) | १०० | १०० |
| (४) | भूजल पूनर्भरण (विहिरी / विंधन विहिरी) | २५० | २५० |
| | **पाण्याचे नुकसान मोजणे आणि गुणवत्तेचे निरीक्षण करणे** | | |
| (५) | सार्वजनिक इमारतींचे जल लेखापरीक्षण / जल अंदाजपत्रक आणि लेखापरीक्षण (वॉटर ऑडिट) | १५० | १५० |
| (६) | पाणी पुरवठा यंत्रणेचे जल लेखापरीक्षण | १५० | -- |
| (७) | जल गुणवत्ता निरीक्षण | १०० | -- |
| (८) | सांडपाण्यावर प्रक्रिया व प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुनर्वापर / जल कार्यक्षम शेती | २०० | १०० |
| (९ ) | पाणीपुरवठा व्यवस्थापन | -- | १५० |
| (१०) | सांडपण्याचे नियोजन | -- | १०० |
| (११) | शाश्वत सणांचा प्रचार | २०० | २०० |
| (१२) | पाणथळ जागांचे संवर्धन | १०० | १०० |
| (१३) | पंचायत विकास निर्देशांक | - | १०० |
| | **जल-एकूण** | **१,८००** | **१,९००** |
| **४.** | **अग्नी** | | |
| (१) | नुतनीकरणयोग्य ऊर्जा स्त्रोत आणि निव्वळ शून्य कार्बन उसर्जनाबाबत प्रसार व प्रचार | ३०० | ३०० |
| | **कार्बन उत्सर्जन कमी असलेल्या उर्जा स्त्रोतांचा अवलंब** | | |
| (२) | हरित पथदिवे | २०० | २०० |
| (३) | स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अक्षय ऊर्जा प्रकल्प बसवणे | ५०० | ५०० |
| (४) | हरीत इमारती / अक्षय ऊर्जेचे स्त्रोत म्हणून बायोगॅस संयंत्रे | ३०० | ३०० |
| (५) | सार्वजनिक इमारतींचे ऊर्जा लेखापरीक्षण / सोलार (सौर) पंप | २०० | २०० |
| (६) | कूल रूफिंग / विकेंद्रीत सौर ऊर्जा संयंत्रे | १०० | २०० |
| | **अग्नी -एकूण** | **१,६००** | **१,७००** |

| अ.क्र. | निर्देशक (अभियान काळातील कार्यवाहीसाठीच्या बाबी) | गुण | |
|---|---|---|---|
| | | नागरी | ग्रामीण |
| **५.** | **आकाश** | | |
| | **सुधारणा** | | |
| (१) | ई-प्लेज (#Epledge) नोंदणी आणि पूर्तता | ६०० | ६०० |
| (२) | समाज माध्यमाचा वापर करून माझी वसुंधरा अभियानाची जनजागृती करणे | ५०० | ५०० |
| (३) | स्पर्धा आणि जनजागृती उपक्रमांद्वारे माझी वसुंधरा अभियानाची जनजागृती करणे | ४०० | ४०० |
| (४) | तरुणांचा सहभाग आणि पर्यावरण दूतांची निवड | ३०० | ३०० |
| (५) | सार्वजनिक ठिकाणी माझी वसुंधरा तत्त्वे दर्शवणाऱ्या बाबींच्या माध्यमातून प्रचार आणि प्रसिध्दी | ८०० | ८०० |
| (६) | बचत गटांचा सहभाग | १०० | १०० |
| (७) | पर्यायी निधी मिळवण्याचे मार्ग : सीएसआर, सामुदायिक सहभाग व इतर | २०० | २०० |
| | **शिक्षण** | | |
| (८) | महाराष्ट्र युथ फॉर क्लायमेट ॲक्शन (MYCA) उपक्रमाद्वारे वातावरणीय बादलांबाबत तरुणांमध्ये जागरूकता | २०० | २०० |
| (९) | पर्यावरण सेवा योजनेत शाळांचा सहभाग | २०० | २०० |
| | **आकाश- एकूण** | **३,३००** | **३,३००** |
| **भूमी, वायू, जल, अग्नी, आकाश एकूण (अमृत गटाकरिता)** | | **१५,२००** | |
| **भूमी, वायू, जल, अग्नी, आकाश एकूण (अमृत गट वगळता इतर नागरी स्थानिक संस्थांसाठी)** | | **१४,७००** | |
| **भूमी, वायू, जल, अग्नी, आकाश एकूण ग्रामपंचायती करिता** | | | **१३,८००** |
| दिनांक १ ते ५ एप्रिल, २०२५ या कालावधीत MIS सादर केल्यास अर्ली बर्डचे गुण | | **२००** | **२००** |
| **भूमी, वायू, जल, अग्नी, आकाश व अर्ली बर्ड मिळून एकूण (अमृत गटाकरिता)** | | **१५,४००** | - |
| **भूमी, वायू, जल, अग्नी, आकाश व अर्ली बर्ड मिळून एकूण (अमृत गट वगळता इतर नागरी स्थानिक संस्थांसाठी)** | | **१४,९००** | - |

| अ.क्र. | निर्देशक<br>(अभियान काळातील कार्यवाहीसाठीच्या बाबी) | गुण | |
|---|---|---|---|
| | | नागरी | ग्रामीण |
| भूमी, वायू, जल, अग्नी, आकाश व अर्ली बर्ड मिळून एकूण ग्रामपंचायती करिता | | - | १४,००० |

६. **स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सदर अभियान प्रभावीपणे राबविण्याची जबाबदारी संबंधित आयुक्त, महानगरपालिका, मुख्याधिकारी, नगरपरिषद/ नगरपंचायत व ग्रामसेवक / ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत यांची राहील. तर, जिल्हयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रमुख म्हणून संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी, जिल्हयाच्या ग्रामीण संस्थांचे प्रमुख म्हणून संबंधित जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी व संबंधित महसूली विभागाचे प्रमुख म्हणून विभागीय आयुक्त यांनी त्यांचे विभागातील / जिल्हयातील स्थानिक संस्थांना प्रोत्साहन देवून त्यांच्याकडून सदर अभियानात उच्चत्तम कामगिरी करून घेण्याची जबाबदारी सोपविण्यात येत आहे**.

७. सदर अभियानाचा कालावधी दिनांक १ जून, २०२४ ते दिनांक ३१ मार्च, २०२५ असा राहिल. या अभियानांतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांनी केलेल्या कामाचे डेस्कटॉप मुल्यमापन दिनांक ६ एप्रिल, २०२५ ते दिनांक ३१ एप्रिल, २०२५ या कालावधीत करण्यात येईल व डेस्कटॉप मुल्यमापनात यशस्वी ठरलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांचे फिल्ड असेसेमेंट दिनांक २ मे, २०२५ ते २५ मे, २०२५ या कालावधीत त्रयस्त यंत्रणां मार्फत करण्यात येईल व त्याचा निकाल जागतिक पर्यावरण दिनी म्हणजे दिनांक ५ जून, २०२५ रोजी जाहिर करून बक्षिस वितरण करण्याचे प्रस्तावित आहे.

८. माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांना पुढे दर्शविल्या प्रमाणे बक्षिसे देण्यात येतील:

**राज्यस्तर (State level):**

(अ) **स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी** :

| अ.क्र. | | लोकसंख्या निहाय गट | गटामधील गुणानुक्रमानुसार | भूमी या थीमॅटिक क्षेत्रात सर्वोत्तम कामगिरी | उंच उडी (High Jump) | बांबू लागवड पुरस्कार |
|---|---|---|---|---|---|---|
| (अ) | **नागरी स्थानिक स्वराज्य संस्था : ४१८** | | | | | |
| (०१) | अमृत शहरे (४३) | १० लक्ष पेक्षा अधिक लोकसंख्या : १० | ३ शहरे | १ | ० | १ |
| (०२) | | ३ लक्ष पेक्षा अधिक परंतु १० लक्ष पेक्षा कमी लोकसंख्या : १७ | ३ शहरे | १ | ० | १ |
| (०३) | | १ लक्ष पेक्षा अक्षिक परंतु ३ लक्ष पेक्षा कमी लोकसंख्या: १६ | ३ शहरे | १ | ० | १ |

| अ.क्र. | | लोकसंख्या निहाय गट | गटामधील गुणानुक्रमानुसार | भूमी या थीमॅटिक क्षेत्रात सर्वोत्तम कामगिरी | उंच उडी (High Jump) | बांबू लागवड पुरस्कार |
|---|---|---|---|---|---|---|
| (०४) | नगरपरिषद व नगर पंचायत (३७५) | ४० हजार पेक्षा अधिक परंतु १लक्ष पेक्षा कमी लोकसंख्या : ७६ | ३ शहरे | १ | १ | १ |
| (०५) | | २५ हजार पेक्षा अधिक परंतु ४० हजार पेक्षा कमी लोकसंख्या : ८७ | ३ शहरे | १ | १ | १ |
| (०६) | | १५ हजार पेक्षा अधिक परंतु २५ हजार पेक्षा कमी लोकसंख्या : १०० | ३ शहरे | १ | १ | १ |
| (०७) | | १५ हजार पेक्षा कमी लोकसंख्या : ११२ | ३ शहरे | १ | १ | १ |
| **(ब)** | **ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था : २७,८९९ ग्राम पंचायती** | | | | | |
| (०८) | ग्राम पंचायती | १० हजार पेक्षा अधिक लोकसंख्या: ३४६ | ३ ग्राम पंचायती | १ | १ | १ |
| (०९) | | ५ हजार पेक्षा अधिक व १० हजार पेक्षा कमी लोकसंख्या: १,४०० | ३ ग्राम पंचायती | १ | १ | १ |
| (१०) | | ३ हजार पेक्षा अधिक व ५ हजार पेक्षा कमी लोकसंख्या: ३,२६१ | ३ ग्राम पंचायती | १ | १ | १ |
| (११) | | २ हजार पेक्षा अधिक व ३ हजार पेक्षा कमी लोकसंख्या: ५,३३५ | ३ ग्राम पंचायती | १ | १ | १ |
| (१२) | | १.५ हजार पेक्षा जास्त व २ हजार पेक्षा कमी लोकसंख्या : ४,९४३ | ३ ग्राम पंचायती | १ | १ | १ |
| (१३) | | १ हजार पेक्षा जास्त व १.५ हजार पेक्षा कमी लोकसंख्या: ६,७८३ | ३ ग्राम पंचायती | १ | १ | १ |
| (१४) | | १ हजार पेक्षा कमी लोकसंख्या: ५,८३१ | ३ ग्राम पंचायती | १ | १ | १ |

**(ब) विभागीय व जिल्हास्तरावरील अधिकाऱ्यांसाठी:**

| | | |
|---|---|---|
| (१) | सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या विभागाचे विभागीय आयुक्त | ३ |
| (२) | राज्यात सर्वोत्तम कामगिरी करणारे जिल्हाधिकारी | ३ |
| (३) | राज्यात सर्वोत्तम कामगिरी करणारे मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. | ३ |
| (४) | राज्यात सर्वोत्तम कामगिरी करणारे गट विकास अधिकारी | ३ |

**<u>विभागीयस्तर (Division Level):</u>**

**स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी: (राज्यस्तरावरील विजेते वगळून)**

| **अ.क्र.** | **गट** | **लोकसंख्या निहाय गट** | **विभागस्तरीय सर्वोत्तम कामगिरी — प्रत्येक विभागासाठी** |
|---|---|---|---|
| (अ) | **नागरी स्थानिक स्वराज्य संस्था : ४१८** | | |
| (०१) | अमृत शहरे (४३) | १० लक्ष पेक्षा अधिक लोकसंख्या : १० | संपूर्ण अमृत गटासाठी १ |
| (०२) | | ३ लक्ष पेक्षा अधिक परंतु १० लक्ष पेक्षा कमी लोकसंख्या : १७ | |
| (०३) | | १ लक्ष पेक्षा अक्षिक परंतु ३ लक्ष पेक्षा कमी लोकसंख्या : १६ | |
| (०४) | नगरपरिषद व नगर पंचायत (३७५) | ४० हजार पेक्षा अधिक परंतु १ लक्ष पेक्षा कमी लोकसंख्या : ७६ | १ |
| (०५) | | २५ हजार पेक्षा अधिक परंतु ४० हजार पेक्षा कमी लोकसंख्या : ८७ | १ |
| (०६) | | १५ हजार पेक्षा अधिक परंतु २५ हजार पेक्षा कमी लोकसंख्या : १०० | १ |
| (०७) | | १५ हजार पेक्षा कमी लोकसंख्या : ११२ | १ |
| **(ब)** | **ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था : २७,८९९** | | |
| (०८) | ग्राम पंचायती | १० हजार पेक्षा अधिक लोकसंख्या: ३४६ | १ |
| (०९) | | ५ हजार पेक्षा अधिक व १० हजार पेक्षा कमी लोकसंख्या : १,४०० | १ |
| (१०) | | ३ हजार पेक्षा अधिक व ५ हजार पेक्षा कमी लोकसंख्या: ३,२६१ | १ |
| (११) | | २ हजार पेक्षा अधिक व ३ हजार पेक्षा कमी लोकसंख्या : ५,३३५ | १ |
| (१२) | | १.५ हजार पेक्षा जास्त व २ हजार पेक्षा कमी लोकसंख्या : ४,९४३ | १ |
| (१३) | | १ हजार पेक्षा जास्त व १.५ हजार पेक्षा कमी लोकसंख्या : ६,७८३ | १ |
| (१४) | | १ हजार पेक्षा कमी लोकसंख्या : ५,८३१ | १ |

**(ब) विभागीय व जिल्हास्तरावरील अधिकाऱ्यांसाठी: (राज्यस्तरावरील विजेते वगळून)**

| | | |
|---|---|---|
| (१) | विभागात सर्वोत्तम कामगिरी करणारे जिल्हाधिकारी<br>( प्रत्येक विभागातून दोन) ६ X २ | १२ |
| (२) | विभागात सर्वोत्तम कामगिरी करणारे मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद ( प्रत्येक विभागातून दोन) ६ X २ | १२ |
| (३) | विभागात सर्वोत्तम कामगिरी करणारे गट विकास अधिकारी,<br>( प्रत्येक विभागातून तीन) ६ X ३ | १८ |
| (४) | जिल्हयामध्ये सर्वोत्तम कामगिरी करणारे गट विकास अधिकारी,<br>( प्रत्येक जिल्हयातून एक) ३५ X १ | ३५ |

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२४०९०६१६१२५६६९०४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SURYAKANT KISAN NIKAM

Digitally signed by SURYAKANT KISAN NIKAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=ENVIRONMENT AND CLIMATE CHANGE DEPARTMENT, 2.5.4.20=3978ce8e745a91e0561f6f9473df7e92873ee7ac8c2f7c49ac520e61061dddед, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=3A94A1F658A34D45CA2859DBC88DFB40760079B8946087EF0FB8BC7CD7314C27, cn=SURYAKANT KISAN NIKAM
Date: 2024.09.06 16:14:22 +05'30'

**( सु.कि.निकम )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति :**

१) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
२) मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. मंत्री, ग्राम विकास, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
६) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
७) अपर मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग विभाग, मुंबई
८) प्रधान सचिव, (नवि-२) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
९) प्रधान सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१०) अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई
११) विभागीय आयुक्त (सर्व)
१२) आयुक्त, तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई
१३) जिल्हाधिकारी (सर्व)
१४) आयुक्त, सर्व महानगरपालिका
१५) सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई
१६) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१७) राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) मुंबई
१८) सह आयुक्त / उप आयुक्त, नगरपालिका शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)
१९) सह आयुक्त / उप आयुक्त, नगरपालिका शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व)
२०) गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
२१) मुख्याधिकारी, नगरपरिषदा / नगरपंचायती (सर्व)
२२) ग्रामसेवक, ग्रामपंचायत (सर्व)
२३) निवडनस्ती,